आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र– दुपारी १.३० वाजता

२५ नोव्हेंबर २०२२ – शुक्रवार

**ठळक बातम्या**

- नामशेष होत चाललेल्या लीथ सॉफ्ट शेल प्रजातीच्या कासव संवर्धनाच्या भारताच्या प्रस्तावाला पनामा वन्यजीव शिखर संमेलनात मान्यता / संवर्धनासाठी भारताच्या प्रयत्नांचं संमेलनात कौतूक

- सेनापती लचित बारफुकन या महान नायकाची जयंती अमृत काळात साजरी करण्याची संधी मिळाली, हे लक्षणीय असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन / बारफुकन यांच्या ४०० व्या जयंती महोत्सवाचा नवी दिल्लीत सांगता समारोह

- पर्यावरणाच्या संरक्षणासाठी तसंच व्यापक असमानते विरुध्द लढण्यासाठी सर्व देशांनी एकत्र येणं गरजेचं असल्याचं भारत प्रशांत क्षेत्रीय संवाद २०२२ कार्यक्रमात संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांचं आवाहन

**आणि**

- ऑकलंड इथं सुरु असलेल्या पहिल्या एक दिवसीय सामन्यात भारताचं न्युझिलंडपुढं विजयासाठी ३०७ धावांचं आव्हान

**<><><><>**

लीथ सॉफ्ट शेल प्रजातीच्या कासवांचं संरक्षण वाढवण्याच्या भारताच्या प्रस्तावाला पनामा वन्यजीव शिखर संमेलनात मान्यता मिळाली आहे. लुप्तप्राय प्रजातींच्या आंतरराष्ट्रीय व्यापार कराराअंतर्गत लीथ सॉफ्ट शेल कासवांचं सरंक्षण वाढवण्यासाठी या प्रजातिला परिशिष्ट- दोन मधून परिशिष्ट- एक मध्ये स्थानांतरित करण्याचा प्रस्ताव भारतानं ठेवला होता. हा प्रस्ताव मंजूर झाल्यामुळं या कासवांच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराला आळा बसू शकेल. लीथ सॉफ्ट शेल प्रकारची

कासवं भारतात काही निवडक नद्या आणि तलावांमध्ये आढळतात. गेल्या तीस वर्षांमध्ये यांची संख्या ९० टक्के घटली आहे.

<><><><>

चीनच्या शिन्जियांग प्रांतात छावणीत कैद करून ठेवलेल्या उईगर समुदायाच्या लोकांना मुक्त करण्यास तसंच त्यांना उपचार आणि मोबदला उपलब्ध करून देण्यास संयुक्त राष्ट्र समितीनं चीनला सांगितलं आहे. संयुक्त राष्ट्र मानवाधिकार प्रमुखांनी यासंदर्भात ऑगस्टमध्ये एक अहवाल सादर केला होता, त्यानंतर परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी चीनवर दडपण वाढलं आहे. जिनेवामधल्या चीनी दूतावासतले प्रवक्ता लियू यू यिन यांनी सांगितलं कि, संयुक्त राष्ट्र समितिच्या या निर्णयावर चीननं विरोध दर्शवला आहे. संयुक्त राष्ट्रची १८ सदस्यीय समिति वांशिक भेदभाव संबंधातल्या १९६५ च्या आंतरराष्ट्रीय करार पालनावर लक्ष ठेवते. चीन सह १८० देश या करारात सहभागी आहेत.

<><><><>

सेनापती लचित बारफुकन या महान नायकाची जयंती अमृत काळात साजरी करण्याची संधी मिळाली, हे लक्षणीय असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत आज नवी दिल्ली इथं आसाममधले अहोम जिल्ह्यातले सेनापती लचित बारफुकन यांच्या ४०० व्या जयंती महोत्सवाचा सांगता समारंभ झाला. भारतात जेव्हा जेव्हा काही आव्हानात्मक परिस्थिती उभी राहिली तेव्हा तेव्हा एखाद्या विभूतीनं अवतार घेतला, असं त्यांनी सांगितलं. भारताची जीवनज्योत अमर आहे, तलवारीच्या जोरावर भारताचा शाश्वत वारसा मिटवू पाहणाऱ्यांना कडक उत्तर देणं भारताला चांगलंच जमतं, असा इशारा त्यांनी यावेळी दिला. आसामचा इतिहास हा भारतीय गौरव गाथेतील अनमोल वारसा असल्याचंही ते म्हणाले. सेनापती लचित बारफुकन यांच्या जीवनावरच्या एका ग्रंथाचं प्रकाशनही यावेळी झालं.

<><><><>

पर्यावरणाच्या संरक्षणासाठी, कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी तसंच व्यापक असमानते विरुध्द लढण्यासाठी सर्व देशांनी एकत्र येणं गरजेचं असल्याचं मत संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी व्यक्त केलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं आयोजित भारत प्रशांत क्षेत्रीय संवाद २०२२ या कार्यक्रमात बोलत होते. विनाशकारी युध्द आणि संघर्षाची पर्वा न करता सर्व देशांनी एकत्रीतपणे या समस्यांचा सामना करायला हवा, असंही ते म्हणाले. ते पुढे म्हणाले की, बाली इथं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी युद्धाच्या युगाचा अस्त झाल्याचं म्हटलं होतं. प्रधानमंत्र्यांच्या या संदेशाचं सर्व देशाच्या नेत्यांनी स्वागत केलं. सामुहिक सुरक्षेचा मापदंड बदलण्याची गरज सिंग यांनी व्यक्त केली. जगाच्या आर्थिक स्थैर्यासाठी भारत - प्रशांत क्षेत्राचा विकास होणं गरजेचं आहे. विभिन्न देशातल्या सागरी मार्गांमुळे व्यापार वाढीला चालना मिळाली असल्याचं ते म्हणाले. भारत- प्रशांत क्षेत्रात आसियानची मध्यवर्ती भूमिका स्वागतार्ह आहे. बहुपक्षीय नितीचं ध्येय वर्तालाप करुनच साध्य होईल, यावर त्यांनी जोर दिला.

<><><><>

मलेशियाच्या प्रधानमंत्रीपदी अन्वर इब्राहिम यांची निवड झाल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांचं अभिनंदन केलं आहे. मलेशियासोबतची धोरणात्मक भागीदारी आणखी दृढ करण्यासाठी एकत्र काम करण्यास उत्सुक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या ट्विटर संदेशात म्हटलं आहे. अन्वर इब्राहिम यांनी काल एका समारंभात प्रधानमंत्री पदाची शपथ घेतली. १९९० मध्ये ते मलेशियाचे उपप्रधानमंत्री होते.

<><><><>

केंद्रीय नागरी हवाई वाहतूक आणि  पोलाद मंत्री जोतिरादित्य सिंधीया यांनी आज कागल येथे युवा मतदात्यांची भेट घेऊन थेट संवाद साधला. त्यांच्या अपेक्षा जाणून घेण्याचा प्रयत्न केला. आठ वर्षांपूर्वी जगात भारतीय अर्थव्यवस्था ११ क्रमांका वर होती. आठ वर्षांत भारतीय अर्थव्यवस्था जगात ५ व्या  क्रमांका वर आणण्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. २०३० पर्यंत आपण जपान आणि जर्मनीला मागे टाकून तिसऱ्या क्रमांकावर येण्याचं ध्येय ठेवलं आहे. लोकशाहीत विकास आणि प्रगतीचा मार्ग प्रशस्त आणि सर्वसमावेशक झाला तर देशाची प्रगती लवकर होते असंही त्यांनी सांगितलं. तसंच त्यांनी सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन केलं.

<><><>

गुजरात विधानसभा निवडणूकीला आता काहीच दिवस उरल्यानं प्रचार शिगेला पोहचला आहे. केन्द्रीय मंत्री अमित शहा यांच्यासह अनेक वरिष्ठ भाजपा नेत्यांच्या आज राज्यात जाहीर सभा आणि रोड शो होणार आहेत. केन्द्रीय मंत्री स्मृती इराणी यांची वलसाड इथं, धर्मेन्द्र प्रधान यांची सुरत, पुरषोत्तम रुपाला यांची नवसारीत प्रचारसभा होणार आहे. तर ज्येष्ठ कॉंग्रेस नेते राजीव शुक्ला आणि अलोक शर्मा यांची अहमदाबाद इथं वार्ताहर परिषद होणार आहे.

<><><>

भिलवाडा इथं झालेल्या गोळीबाराच्या पार्श्वभूमीवर कायदा सुव्यवस्था कायम राखण्याच्या दृष्टीनं राजस्थानात सुरक्षा व्यवस्था चोख करण्यात आली आहे. पोलीस अधिक्षक आणि त्यांचं पथक परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे, इथली कायदा सुव्यवस्थेची स्थिती नियंत्रणात आहे असं  अतिरिक्त पोलीस महासंचालक हवासिंग घुमारीया यांनी सांगितलं. कोतवाली पोलीस हद्दीतल्या बदला चौक इथं काल

झालेल्या गोळीबारात एका तरुणाचा मृत्यू झाला होता. संपूर्ण जिल्ह्यात काल संध्याकाळी ७ वाजल्यापासून, पुढल्या ४८ तासांसाठी इंटरनेट सेवा बंद केली आहे.

<><><><>

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात ऑकलंड इथं सुरु असलेल्या मालिकेतल्या पहिल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात न्यूझीलंडला विजयासाठी १८ षटकात १४४ धावांची गरज आहे. भारतानं ५० षटकात ७ गडी बाद ३०६ धावा केल्या आहेत. विजयासाठी ३०७ धावांचं लक्ष्य घेऊन मैदानात उतरलेल्या न्यूझीलंडचे आत्तापर्यंत ३ गडी बाद झाले आहेत. श्रेयस अय्यरनं ८०, शिखर धवननं ७२, शुभमन गिलनं ५० धावा करून भारताच्या धावसंख्येला आकार दिला.

<><><><>

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचा आज ३९वा स्मृतिदिन आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कराड इथल्या प्रीतिसंगमावरच्या स्मृतिस्थळावर पुष्पचक्र वाहून श्रांद्धांजली अर्पण केली. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात चव्हाण यांच्या साहित्याचं प्रदर्शन आयोजित करण्यात आलं आहे.

**//<><><><>//**